जिल्हा वार्षिक योजना सन २०१०-११
अंतर्गत राबवावयाच्या योजनांबाबत
(सर्वसाधारण योजना)
वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : जिवायो-२०१०/प्र.क्र.३४०/पदुम-४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० ऑगस्ट, २०१०

वाचा - १. शासन निर्णय क्र.एलव्हीएस-१०९८/१४७६९/१०४/पदुम-४, १४/०७/१९९८
२. शासन निर्णय क्र.सीडीएस-१०९९/२२३२३/के.नं.८७/९९/पदुम-३, दि.१५.१२.१९९९
३. शासन निर्णय क्र.एफडीआर-२०००/१७६७७/प्र.क्र.९६/पदुम-३, दि.१८.११.२०००.
४. शासन नियोजन विभागाचे पत्र क्र.जिवायो-१००९/प्र.क्र.२१३/का.१४८१
दिनांक ३० डिसेंबर, २००९.

**शासन निर्णय -**

विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रमांतर्गत संकरीत कालवडी व सुधारित म्हशींच्या पारड्यांची जोपासना, अर्थसहाय्य, देशी गोवंशांची जपणूक व संवर्धन अंतर्गत देवणी जातीच्या कालवडींना खाद्य अनुदान व शेतकऱ्यांच्या शेतावर वैरण उत्पादनासाठी शेतकऱ्यांना उत्तेजित करण्यासाठी १००% अनुदानावर बियाणे वाटप या योजने संदर्भ क्र.१,२ व ३ वरील शासन निर्णय अधिक्रमित करून **जिल्हा वार्षिक योजने (सर्वसाधारण योजना) अंतर्गत वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम** ही योजना सन २०१०-११ पासून राज्यात राबविण्यास याद्वारे शासनाची प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. या योजने अंतर्गत खालील कार्यक्रम राबविण्यात यावेत.

**अ. शेतकऱ्यांच्या शेतावर वैरण उत्पादनासाठी प्रोत्साहनपर वैरण बियाणे वाटप**

राज्यातील वैरण उत्पादनामधील कमतरता काही प्रमाणात भरून काढण्याकरिता तसेच पशुपालकांकडे असलेल्या पशुधनाची उत्पादकता वाढविणे व त्या अनुषंगाने जास्तीत जास्त दुग्ध उत्पादनासाठी पशुपालकाकडे असलेल्या पशुधनाला पुरेशी हिरवी वैरण उपलब्ध होण्यासाठी जास्तीत जास्त क्षेत्रावर वैरणीचे उत्पादन घेणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या शेतावर वैरणीचे उत्पादन घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सदर कार्यक्रम राबविण्यात यावा.

१. या अंतर्गत वैरण बियाण्याचा पुरवठा करतांना लाभार्थीकडे वैरण उत्पादनासाठी स्वतःची शेतजमीन व सिंचनाची सुविधा असणे आवश्यक आहे. या कार्यक्रमांतर्गत ज्वारी, मका, बाजरी, बरसीम, लुसर्न व इतर बियाणे तसेच नेपियर, यशवंत, जयवंत इ. सुधारित बहुवर्षिय गवत प्रजातींची ठोंबे वाटप करावीत.

२. ज्या लाभार्थीकडे स्वतःची किमान ३ ते ४ जनावरे आहेत अशा लाभार्थींना प्राधान्य द्यावे.

३. प्रति लाभार्थी एक एकरच्या क्षेत्रात वैरण उत्पादन घेण्यासाठी १००% अनुदानावर रू ६००/- च्या मर्यादेत वैरणीच्या बियाणांचा/ठोंबाचा पुरवठा करण्यात यावा.